ॲड. रामेश्वर पाटील पळसकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा >>पान 2

जिल्ह्यात सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम सुरु >>पान 3

भालेगाव येथे तलाठीभवन बांधकामाचे संजय रायमुलकर यांच्या हस्ते लोकार्पण >>पान 4


**सुविचार**
ज्ञान हीच प्रगतीची गुरुकिल्ली आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 134 ■ बुधवार, दि. 25 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006





बिग बॉसमध्ये केला कल्ला, आता मोठा पडदा गाजवणार अभिनेत्री, आयटम साँगने करणार राडा

आतील पान

## हयगय चालणार नाय; अजित पवार ॲक्शन मोडवर

### 'वित्त व नियोजन', 'राज्य उत्पादन शुल्क' अधिकाऱ्यांना इशारा



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील मंत्रीम होदयांना दालनाचे वाटप झाल्यानंतर आज अनेक मंत्र्यांनी आपला पदभार स्वीकारला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'वित्त व नियोजन'सह 'राज्य उत्पादन शुल्क' मंत्रीपदांची सुत्रे हाती घेताच आज ( मंगळवारी) मंत्रालयात दोन्ही विभागांसह शासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वित्त, नियोजन आणि उत्पादनशुल्क विभागाच्या कामकाजाचा आढावा घेतला. मंत्र्यांचे खातेवाटप होताच उपमुख्यमंत्री अजित पवार ॲक्शन मोडवर आले असून करसंकलन आणि महसुलवाढीच्या प्रक्रियेत सुसुत्रता, सुधारणा आणत 'रिझल्ट ओरियंटेड' काम करण्याचे निर्देश वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले. अधिकाऱ्यांनी पारदर्शक कारभार करावा. करचोरी, करगळती रोखण्याच्या कर्तव्यात हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात 'वित्त व नियोजन' विभागासह 'राज्य उत्पादन शुल्क' विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विभागांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी वित्त व नियोजन विभागाचे राज्यमंत्री अशिष जयस्वाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वस्तू व सेवा कर विभागाचे राज्य आयुक्त आशीष शर्मा, वित्त विभागाच्या (वित्तीय सुधारणा) सचिव शैलजा ए., लेखा व कोषागारे विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपसचिव रविंद्र औटे, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सहआयुक्त विश्वनाथ इंदिसे, सहआयुक्त सुनिल चव्हाण, अपर आयुक्त यतीन सावंत, उपायुक्त सुभाष बोडखे, उपायुक्त शंकर जगताप आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी प्रलंबित योजना, आवश्यक निधी, तसेच राज्याच्या उत्पन्नाचा आढावा घेतला. या बैठकीत राज्यातील महसुली सुधारणा, शेती विकास, औद्योगिक गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती यासारख्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या आणि सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी वित्तीय योजना आणण्यावर भर देण्याच्या सूचना देत राज्याच्या महसूल वाढीसाठी करचोरी, करगळतीसह गैरकारभार रोखण्याच्या सूचना दिल्या. करसंकलनाचे उद्दीष्ट गाठण्यासाठी सर्व सुविधा पुरविण्यात येतील परंतु कामात परिस्थितीत हयगय चालणार नसल्याचे सांगत रिझल्ट ओरियंटेड काम करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाचा सविस्तर आढावा घेतला. राज्यातील बेकायदा दारूविक्रीवर कडक निर्बंध आणण्यासाठी पारदर्शक व्यवस्था उभारण्याचे निर्देश दिले.

## कुणाचाही बाप येवू दे मस्साजोग प्रकरण दबू देणार नाही- मनोजजरांगे पाटील



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** कुणाचाही बाप येवू दे मस्साजोग प्रकरण दबू देणार नाही अशी प्रतिक्रिया मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिली. आज जरांगे पाटील हे उद्या परभणी आणि मस्साजोग येथील कुटुंबीयांची भेट घेणार आहेत. संतोष देशमुख यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी जनतेनं २८ तारखेला बीडमध्ये मोर्चा काढला आहे. त्याचबरोबर कोणताही जहांगिरदार आला तरी हे प्रकरण दबू देणार नाही आणि मी हटणारही नाही असं जरांगे यांनी म्हंटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हंटलं आहे की कुणालाही सोडणार नाही. पण कधी, यांना तपासाला इतका वेळ का लागतो आहे ? असे देखील जरांगे म्हणाले आहेत.

## पंढरपूर पोलीसांची अवैध दारु विक्रीवर कारवाई; ३,२७,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी :** पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील मौजे रांजणी या गावी २३ डिसेंबर रोजी पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले यांना मिळालेल्या माहितीनुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच एच.डी.पी.ओ सोलापूर कार्यालय स्टॉप व पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन स्टाफ यांनी एकत्रित कारवाई केली. या कारवाईत प्रदीप अवताडे यांचे राहत्या घरी जिन्याखाली देशी दारूचे एकूण ९६ बॉक्स आढळले. सदर आरोपी प्रदीप अवताडे यांच्याविरुद्ध मुंबई दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. तसेच सर्व ९६ बॉक्स दारू जप्त करण्यात आले असून सदर देशी दारूची एकूण किंमत ३,२७,००० ( तीन लाख २७ हजार रुपये) इतकी आहे.

## नव्या वर्षात विठ्ठलपुजेचे ऑनलाईन बुकिंग १ जानेवारीपासून सुरु होणार

दैनिक आपला विदर्भ



**पंढरपूर/प्रतिनिधी :** सावळ्या विठुरायाची पूजा करण्यासाठीची हजारो भाविकांची प्रतीक्षा आता संपली आहे. नवीन वर्षातील पहिल्या तीन महिन्यांसाठी येत्या १ जानेवारी रोजी विठ्ठल रुक्मिणीच्या तुळशीपूजा, नित्यपूजा आणि पाद्यपूजेसाठी ऑनलाईन बुकिंग सुरु केले जाणार आहे. भाविकांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अधिकृत संकेत स्थळावरच आऑनलाईन बुकिंग करावे असे आवाहन मंदिर समितीकडून करण्यात आले आहे. भाविकांना आता घर बसल्या पूजेची नोंदणी करता येणार आहे. विठ्ठल आणि रुक्मिणीच्या नित्य, तुळशी आणि पाद्यपूजेमध्ये पारदर्शकता आणि सुसूत्रता यावी यासाठी मंदिर समितीने प्रथमच ऑनलाईन बुकिंग करण्याचा निर्णय घेतला आहे. तशी यंत्रणा देखील कार्यान्वीत केली आहे. नव्या वर्षातील विठ्ठल आणि रुक्मिणी मातेच्या सर्व पूजांचे बुकिंग हे ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. भाविकांमधून मंदिर समितीच्या या नव्या निर्णयाचे स्वागत केले जात आहे.

## बलात्कार, ॲसिड हल्ल्यातील पीडितांना प्रथमोपचारापासून शस्त्रक्रियांपर्यंत सर्व उपचार मोफत; उच्च न्यायालयाचे ऐतिहासिक निर्देश

**दिल्ली** : दिल्ली उच्च न्यायालयाने मंगळवारी एक ऐतिहासिक निकाल देत बलात्कार, सिड हल्ला, लैंगिक अत्याचार आणि पॉस्को प्रकरणातील पीडितांना सरकारी आणि खाजगी रुग्णालयात मोफत वैद्यकीय उपचार मिळण्याचा हक्क असल्याचे म्हटले आहे.

या प्रकरणी आदेश देताना दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती प्रतिभा सिंग आणि न्यायमूर्ती अमित शर्मा यांच्या खंडपीठाने म्हटले की, बलात्कार, सिड हल्ल्यातून वाचलेल्या पीडितांना केंद्र व सर्व राज्यांच्या सरकारांनी, खासगी आणि सरकारी रुग्णालयांत मोफत उपचार पुरवावेत.

यावेळी न्यायालयाने स्पष्ट केले की, या उपचारांमध्ये प्रथमोपचार, निदान, प्रयोगशाळेतील चाचण्या, आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया, शारीरिक आणि मानसिक समुपदेशन यांचा समावेश असेल. बलात्कार आणि पॉक्सो प्रकरणे नियमितपणे न्यायालयासमोर येत असतात. या प्रकरणांमध्ये वाचलेल्या पीडितांना बऱ्याचदा तात्काळ किंवा दीर्घकाळापर्यंत वैद्यकीय उपचारांची गरज असते. ज्यात रुग्णालयात दाखल करणे, निदान, शस्त्रक्रिया, औषधे आणि समुपदेशनाचा समावेश असतो.

सुनावणी वेळी न्यायालयाने हे ही नमूद केले की, विविध कायदे आणि आरोग्य मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानंतरही बलात्कार, सिड हल्ल्यातून वाचलेल्या पीडितांना उपचार मिळवण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.



दरम्यान न्यायालयासमोर एका व्यक्तीने त्याचा मुलीवर केलेल्या बलात्काराच्या प्रकरणाची सुनावणी सुरू होती. त्यावेळी आरोपीने पीडित मुलीच्या उपचारांसाठी जामीन मागितला होता. त्यानंतर दिल्ली न्यायालयाने हे निर्देश जारी केले.

**काय आहेत न्यायालयाचे निर्देश?**

पीडितांवर कोणत्याही ओळपत्रांशिवाय आणि उपचाराच्या शुल्कांची मागणी न करता प्रथमोपचार, निदान चाचण्या आणि आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया केल्या पाहिजेत. उपचारांमध्ये लैंगिक संक्रमित रोगांचा आणि गर्भधारणेच्या तपासण्यांचाही समावेश असावा.

बलात्कार, सिड हल्ल्यातून वाचलेल्या पीडितांचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे शारीरिक आणि मानसिक समुपदेशन करण्यात यावे.

सर्व रुग्णालयांनी रुग्णांना दिसेल अशा ठिकाणी लैंगिक अत्याचार, बलात्कार, सामूहिक बलात्कार, सिड हल्ल्यातून वाचलेल्या पीडितांसाठी मोफत उपचार उपलब्ध असल्याचे स्थानिक आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांमध्ये फलक लावावेत.

**दंड आणि तुरुंगवासाची शिक्षा**

यावेळी न्यायालयाने सर्व रुग्णालयांना निर्देश दिले की, त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना भारतीय न्याय संहिता, सीआरपीसी, आयपीसी आणि पॉस्को कायद्यातील तरतुदींची माहिती द्यावी. या तरतुदींचे पालन न केल्यास किंवा उपचारांस नकार दिल्यास दंड आणि तुरुंगावासाच्या शिक्षेला सामोरे जावे लागेल असे स्पष्ट केले आहे.

## अपघातांची मालिका थांबेना; मद्यधुंद कार चालकाने ९ जणांना उडवले, ४ जण गंभीर जखमी

**ठाणे/प्रतिनिधी :** उल्हासनगर येथील कॅम्प नंबर चारच्या व्हीनस चौकात आज (२४ डिसेंबर) पहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. एका मद्यधुंद कारचालकानं ९ जणांना धडक दिली. या घटनेत ४ जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

कारचा चक्काचूर : मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे पाचच्या सुमारास हा अपघात झाला. कार चालक व्हीनस चौक परिसरातून कार भरधाव वेगानं घेऊन जात असताना त्यानं रस्त्यावरून जाणाऱ्या रिक्षा आणि काही नागरिकांना जोरदार धडक दिली. कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्यानं हा अपघात झाल्याची माहिती अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीनं दिली. यातील दोघांवर खासगी तर इतर दोघांवर शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात इतका भीषण होता की, कारचा अक्षरश: चक्काचूर झाला आहे. या अपघातात कार चालकासह ४ जण गंभीररित्या जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आता याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

पुण्यात डंपर चालकानं फूटपाथवर झोपलेल्या ९ जणांना चिरडले : दारूच्या नशेत गाडी चालवून तळीराम स्वत:सहीत इतरांचाही जीव धोक्यात घालत आहेत.

## इंडिया आघाडीचे नेतृत्व काँग्रेसने सोडण्याची गरज - मणिशंकर अय्यर यांचा घरचा आहेर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी केंद्रीय मंत्री मणिशंकर अय्यर यांनी पुन्हा एकदा काँग्रेसला घरचा आहेर दिला आहे. इंडिया ब्लॉकचं नेतृत्व करण्याबाबत काँग्रेसनं विचार करू नये तर ज्याला या आघाडीचं नेतृत्व करण्याची इच्छा आहे, त्यांना नेतृत्व करण्याची संधी द्यावी, असं मत अय्यर यांनी व्यक्त केलं. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यामध्ये या इंडिया आघाडीचं नेतृत्व करण्याची क्षमता आहे. तसंच या आघाडीतील अन्य पक्षांच्या काही नेत्यांमध्ये देखील ही क्षमता आहे, अशी टिप्पणी अय्यर यांनी केली आहे.

नेतृत्वाबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह – केंद्रातील नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार विरोधात इंडिया आघाडीच्या माध्यम ातून देशभरात लोकसभा निवडणुकीत लढा देण्यात आला. मात्र गेल्या काही काळापासून या आघाडीचं नेतृत्व करण्यावरुन वाद उफाळून आला आहे. काही दिवसांपूर्वी ममता बॅनर्जी यांनी या आघाडीचं नेतृत्व करण्याची इच्छा व्यक्त केली होती. ममता बॅनर्जीच्या या इच्छेला इंडिया आघाडीतील काही घटक पक्षांनी पाठिंबा दर्शवला आहे. महाराष्ट्र विधानसभेत इंडिया आघाडीचा भाग असलेल्या महाविकास आघाडीला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. त्यानंतर इंडिया आघाडीच्या नेतृत्वाबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. या पार्श्वभूमीवर मणिशंकर अय्यर यांनी केलेल्या टिप्पणीमुळे काँग्रेसला घरचा आहेर मिळाला आहे.

आघाडीचे नेतृत्व केले नाही तरीही... –काँग्रेसने इंडिया आघाडीचे नेतृत्व करण्याबाबत विचार करू नये, ज्यांना इच्छा आहे त्यांना ही संधी द्यावी, असे वक्तव्य त्यांनी केले आहे. त्याचवेळी या आघाडीचे नेतृत्व कोणीही केले तरी त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे स्थान काँग्रेस पक्ष आणि काँग्रेसच्या नेतृत्वाला आघाडीत नेहमीच राहील, असेही अय्यर म्हणाले आहेत. काँग्रेसने आघाडीचे नेतृत्व केले नाही तरीही देशातील विरोधी पक्षांमध्ये काँग्रेसचे महत्त्वपूर्ण स्थान कायम राहील. राहुल गांधींना या आघाडीच्या अध्यक्ष पदाच्या स्वरूपात जेवढा सन्मान मिळेल त्यापेक्षा जास्त सन्मान त्यांना काँग्रेसचे प्रमुख म्हणून मिळेल असं ते म्हणाले आहेत.



इंडिया आघाडीच्या बैठकीत बहुमताने निर्णय होईल – काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते सुरेंद्र राजपूत याबाबत म्हणाले, इंडिया आघाडी ही ३६ पक्षांची आघाडी आहे. या आघाडीतील अनेक नेत्यांमध्ये या आघाडीचं नेतृत्व करण्याची क्षमता आहे. इंडिया आघाडीची जेव्हा बैठक होईल तेव्हा त्यामध्ये नेतृत्वाबाबत चर्चा झाली तर बैठकीत उपस्थितांच्या बहुमतानं निर्णय घेतला जाईल. याबाबत राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे यांनी या विषयावर बोलण्यास नकार दिला. माजी मंत्री, काँग्रेसचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी या विषयावर आपण बोलू शकत नाही, असे स्पष्ट केले. महाराष्ट्र विधानसभेतील माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी आपण याबाबत माहिती घेऊन नंतर बोलू, अद्याप याबाबत काही वाचलं किंवा ऐकले नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली.

# अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी :** शांत, संयमी व सर्वांना सोबत घेऊन चालणारे व्यक्तिमत्व म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर उर्फ बाळूमामा यांची संपूर्ण तालुक्यात ख्याती आहे. त्यामुळे त्यांचा संपूर्ण तालुक्यात चाहता वर्ग मोठ्या प्रमाणात आहे.२४ डिसेंबर रोजी त्यांच्या चाहत्यांनी अभिष्टचिंतन सोहळा जल्लोषात साजरा केला.

मेहकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर हे शेतकरी कुटुंबातील असल्याने त्यांना सर्वसामान्य गोरगरीबांच्या समस्येची जाण असल्याने प्रत्येकाला मदत करण्याची त्यांची वृत्ती सुरुवातीपासूनच आहे. शांत संयमी व मितभाषी असलेले अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर यांचा त्यांच्या स्वभावाने संपूर्ण तालुक्यात मोठा चाहता वर्ग आहे.

साधी राहणी व उच्च विचारसरणी, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे ते प्रत्येकाला आपलेसे वाटतात. तसेच ते प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये सहभागी होतात. २४ डिसेंबर रोजी बाजार समितीचे संचालक अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक उपयोगी कार्यक्रम राबवून त्यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला.

राहुल शिंगणे तसेच अमोल धोटे यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोणगाव येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करत अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर यांचा वाढदिवस साजरा केला.या कार्यक्रमाला डोणगाव शिवसेना शहर प्रमुख मुक्तेश्वर काळदाते, युवाशिवसेना शहर प्रमुख सुरज दिनोरे, किशोर वाघमारे, बालप्रसाद आखाडे, अमोल पळसकर, उमेश पळसकर, अमोल काळे, शुभम जुनघरे, राजेश जाधव यांच्यासह शिक्षकवृंद विद्यार्थी व गावकरी मंडळी मोठ्या उत्साहाने उपस्थित होते. यास विविध ठिकाणी त्यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन सोहळा सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. तालुक्यातील सामाजिक राजकीय तथा शेतकरी सर्वसामान्यांनी अ‍ॅड. रामेश्वर पाटील पळसकर यांना प्रत्यक्ष भेटून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मिळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली. राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला. त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते. परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले. सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

## बिग बॉसमध्ये केला कल्ला, आता मोठा पडदा गाजवणार अभिनेत्री, आयटम साँगने करणार राडा

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई : बिग बॉस मराठी ५ सीझन खूप गाजला. यंदाच्या स्पर्धकांनी तर या सीझनमध्ये कल्लाच केला. यातील टॉपचं नाव म्हणजे निक्की तांबोळी. ती तर शोमध्ये पहिल्या दिवसापासूनच हॉट टॉपिक होती. निक्की शोमध्ये टॉप ३ पर्यंत पोहोचली मात्र तिने शो गाजवला. बिग बॉस गाजवल्यानंतर आता निक्की मोठ्या पडद्याकडे वळाली आहे. तिची लोकप्रियता पाहता आता ती मोठ्या पडद्यावर आपली जादू दाखवण्यासाठी सज्ज झालीये.

निक्की तांबोळी सोशल मीडियावर खूप सक्रिय असते. तिने तिच्या सोशल मीडिया माध्यमातून या नव्या प्रोजेक्टविषयी सांगितलं. आता लवकरच निक्की नव्या सिनेमात आणि नव्या भूमिकेत प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. निक्की नेमकं कोणत्या सिनेमात आणि कोणत्या भूमिकेत दिसणार याविषयी जाणून घेऊया.

निक्की तांबोळी दिसणार मोठ्या पडद्यावर

बिग बॉस गाजवल्यानंतर निक्की तांबोळी आता पंजाबी इंडस्ट्रीवर आपली छाप सोडणार आहे. ती लवकरच पंजाबी सिनेमा 'बदनाम' झळकणार आहे. या सिनेमात ती आयटम साँग करणार आहे. त्यामुळे निक्की आपल्या हॉटनेस आणि बोल्डनेसने मोठ्या पडद्यावर राडा करण्यासाठी एकदम तयार आहे.

दरम्यान, 'बदनाम' हा सिनेमा फेब्रुवारी २०२५ मध्ये रिलीज होणार आहे. जय रंधावा, जास्मिन भसीन आणि मुकेश ऋषी स्टारर हा एक रोमँटिक ड्रामा आहे. त्यामुळे निक्कीचे चाहते तिच्यासाठी फार उत्सुक आहेत. तिला मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी चाहत्यांची उत्कंठा वाढली आहे.

## सोन्याच्या हव्यासापायी सालगड्याकडून शेतमालकाचा निर्घृण खून; मृतदेहाचे तुकडे करुन शौचालयाच्या शोष खड्ड्यात पुरले

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोन्याच्या हव्यासापोटी सालगड्याने आपल्याच शेत मालकाचा निर्घृण खून केल्याचा प्रकार मोहोळ तालुक्यातील यल्लमवाडी येथे घडला. धक्कादायक बाब म्हणजे संशयित मारेकऱ्याने मृत शेतकऱ्याच्या शरीराचे तुकडे करून शौचालयाच्या शोष खड्ड्यात पुरून ठेवल्याचे पोलीस तपासातून उघडकीस आले आहे. हा खून एकट्याने सालगड्याने केल्याची प्राथमिक माहिती असली तरी त्याच्यासोबत अन्य साथीदार आहेत किंवा कसे, याबाबत मोहोळ पोलीस अधिक तपास करीत आहेत. कृष्णा नारायण चामे (वय ५२) असे खून झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी संशयित आरोपी शेतमजुराला अटक केली आहे. मृत कृष्णा चामे हे बेपत्ता झाल्याबाबत त्यांच्या घरच्या मंडळींनी मोहोळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली होती. पोलिसांच्या तपासात कृष्णा चामे यांच्या ठाव ठिकाणाबाबत कोणतीही माहिती मिळत नव्हती. तपासात मृत चामे यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करीत असलेल्या सचिन भागवत गिरी याने दिलेल्या माहितीनुसार कृष्णा चामे यांना एका अज्ञात व्यक्तीने दुचाकी वर बसवून नेल्याचे समोर आले.




## मी दाऊदचा भाऊ, माझे कोण वाकडे करणार, म्हणणाऱ्या इकबाल कासकरला ईडीचा दणका!

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** मी दाऊदचा भाऊ, माझं कोण काय वाकडं करणार असं म्हणणाऱ्या अंडरवर्ल्डचा कुख्यात डॉन दाऊद इब्राहिमचा भाऊ इकबाल कासकरला अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) जोरदार दणका दिला आहे. इकबाल कासकरचा ईडीने जप्त केलेला ठाण्यातील फ्लॅट आता ईडीने ताब्यात घेतला आहे. ठाणे पोलिसांच्या खंडणी विरोधी पथकाकडे २०१७ साली इकबाल कासकर विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. ही प्रॉपर्टी खंडणीच्या माध्यमातून बळकावण्यात आली होती. दाऊद इब्राहिमचा भाऊ इकबाल कासकर आणि त्यांच्या इतर साथीदारांवर मनी लॉन्ड्रींग प्रकरणात ईडीने कारवाई केली होती.या कारवाईत ठाण्यातील घोडबंदर रोडवर असलेल्या कासकरच्या फ्लॅटवर ईडीने जप्ती आणली होती. तो फ्लॅट आता ईडीने ताब्यात घेतला आहे. याबाबतची नोटीस देखील इडीने फ्लॅटच्या दारावर लावली आहे. घोडबंदर येथील कावेसर मधील नियोपोलीस टॉवरमध्ये कासकरने हा फ्लॅट घेतला होता. याची किंमत ७५ लाख इतकी आहे. २०१७ साली इकबाल कासकरने हा फ्लॅट बिल्डर सुरेश मेहता आणि त्याची फर्म दर्शन इंटरप्रायजेसला धमकावून घेतला होता. याबाबत ठाणे गुन्हे शाखा आणि खंडणी विरोधी शाखेत गुन्हा दाखल होता. खंडणी, धमकावणे, मनी लॉन्ड्रिंग आणि विविध गुन्ह्यांमध्ये इकबाल कासकर सध्या कारागृहात शिक्षा भोगत आहे. धक्कादायक बाब म्हणजे ईडीने कासकरचा जो फ्लॅट सील केलाय, त्यात कासकरच्या परिवाराने १५ दिवसांपूर्वी सील तोडून घरात प्रवेश केला होता, अशी माहिती इमारतीच्या सदस्यांनी दिली. इकबाल कासकर आणि त्याचे सहकारी मुमताझ शेख आणि इसरार सईद यांनी अनेक व्यापाऱ्यांना धमकावून त्यांच्याकडून पैसे जमा केले होते. तसेच त्यांची संपत्ती बळकावली होती. मुमताज शेखच्या नावावर प्रॉपर्टी करण्यासाठी बिल्डरवर दबाव टाकण्यात आला होता. खंडणीप्रकरणी तपास यंत्रणेने इश्थअ अंतर्गत आरोपपत्र दाखल केले आहे.







DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# जिल्ह्यात सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम सुरु

## ३ लाख लोकांचे होणार सर्वेक्षण; १५१ पथकांची निर्मिती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी** :राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यकम अतर्गत जिल्ह्यात सक्रीय क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येत आहे. क्षयरोग निदानापासून वंचित असणाऱ्या क्षयरुग्णांना गृहभेटीव्दारे शोधून काढण्यासाठी केंद्र शासनातर्फे ही मोहीम राज्यामध्ये राबविण्याचे ठरविलेले आहे. या मोहिमेंतर्गत ३०१५३३ लोकसंख्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्ह्यामध्ये १५१ पथकांची निर्मीती करण्यांत आलेली आहे. ही दि. २३ डिसेंबर ते ३ जानेवारी २०२५ या कालावधीत बुलडाणा जिल्ह्यामध्ये राबवण्याची तयारी करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यकम अंतर्गत जिल्ह्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वावर सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे सन २००३ पासून राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम राबविण्यात येतो. या कार्यक्रमातर्गत क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तीचे रोगनिदान शासकीय आरोग्य संस्थेत करण्यात येते. बरेचसे क्षयरुग्ण खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांकडे उपचार घेत असतात.



केंद्र सरकारतर्फे या क्षय रुग्णांचे नोटिफिकेशन शासनाकडे करण्यसाठी अधिसूचना जारी करण्यात आली. यामुळे काही प्रमाणात क्षयरुग्ण नोंदणी मध्ये अल्पशी वाढ झालेली आहे. फुपुसाचा क्षयरोग असणारे बरेचसे रुग्ण होणाऱ्या त्रासाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे व त्याबाबत डॉक्टरांकडे जाण्याचे टाळत असल्याचे आढळले आहे.

या कार्यक्रमातंर्गत क्षयरुग्ण नोंदणी होण्याचे प्रमाण वाढणे तसेच समाजामध्ये क्षयरोगाबद्दल जनजागृती होऊन क्षयरोगाचे निदान लवकर होण्यास मदत होईल. सर्वेक्षणासाठी जिल्ह्यातील एकूण ३०१५३२८ लोकसंख्यापैकी १० टक्के म्हणजे ३०१५३३ लोकसंख्यांचे सर्वे क्षण करण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हयामध्ये १५१ पथकांची निर्मीती करण्यांत आलेली आहे. तसेच ३० सुपयरवायझर, व आशावर्कर एकुण टिममेंबर ३०२ अशा कर्मचाऱ्यांमार्फत सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

या मोहिमेचे उद्दिष्ट क्षयरोगाचे निदान होण्यापासून अद्यापही वंचित असणाऱ्या सर्व क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांना क्षयरोग औषधोपचारावर आणणे आहे. यानुसार या मोहिमेमध्ये जोखमीच्या क्षेत्र / ठिकाणी गृहभेट देऊन क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तींना शोधणे. त्यांची थुंकी नमुने तपासणी, एक्स रे व आवश्यकते प्रमाणे इतर तपासण्या करुन क्षयरोगाचे निदान करणे आणि औषधोपचार सुरु करणे अपेक्षित आहे.

यासाठी राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमातील कर्मचारी त्यांचे भागधारक अशासकीय संस्था तसेच सार्वजनिक आरोग्य सेवेतील कर्मचारी वर्ग यांची पथके निवडलेल्या भागात घरोघरी संशयित क्षयरुग्णांचे सर्वेक्षण करणार आहे. मोहिमेदरम्यान सर्व गरजू व्यक्तींनी संधीचा लाभ घेण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणाऱ्या भागामध्ये गृहभेटी व्दारे घरातील व्यक्तींशी संवाद साधणे, पोस्टर्स, बॅनर्स, पॅम्फलेटस या व्दारे व्यापक प्रसिध्दी करण्यात येत आहे.

या विशेष मोहिमेतंर्गत बुलडाणा जिल्हयातील वंचित घटक उदा. झोपडपट्टी, पोहचण्यासाठी अवघड गावे आणि वस्त्या, कारागृहातील कैदी, ज्या गावात रुग्ण जास्त असू शकतात असे गावे, एच आय व्ही अतिजोखीम गट, असंघटित कामगार, बांधकाम स्थळाच्या ठिकाणी काम करणारे कामगार, बेघर, वृध्दाश्रम अशा निवडलेल्या भागांमध्ये सार्वजनिक आरोग्य सेवेतील कर्मचारी , आशावर्कर,आंगणकवाडी सेविका तसेच नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी आणि इतर स्वयंसेवक हे भेटणारे संशति क्षयरुग्णांचे सर्वेक्षण करणार आहे. गृहभेटी दरम्यान पथक सदस्य निश्रिचत केलेल्या सर्व घरांना भेटी देऊन घरात असलेल्या सर्व व्यक्तींची क्षयरोग लक्षणांनी माहिती घेणार असून क्षयरोगाची लक्षणे असणाऱ्या व्यक्तीची थुंकी नमुना गोळा करुन तपासणी करिता जवळच्या प्रयोगशाळेला पाठविणार आहे.

क्षयरोगाची खालीलप्रमाणे लक्षणे असतात. दोन आठवडे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचा खोकला असणे.तसेच दोन आठवड्यापेक्षा जास्त मुदतीचा ताप असणे. मागील तीन महिन्यामध्ये वजमात लक्षणीय घट असणे. थुंकीवाटे रक्त पडणे, छातीत दुखणे व मानेवरील गाठ, यापूर्वी क्षयरोगाचे उपचार घेतलेले असणे. यापैकी कोणतेही लक्षणे असल्यास सदर व्यक्तीने तपासणी करुन घेणे आवश्यक आहे. जिल्हयातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत थुंकीनमुना तपासणी, क्ष-किरण तपासणी व्यवस्था उपलब्ध आहे. तसेच डॉक्टरांच्या सल्लयानुसार सीबीनॅट मशीनव्दारे तपासणी व्यवस्था उपलब्ध आहे. निदान आलेल्या सर्व क्षयरुग्णांना मोफत उपचार सर्व शासकिय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध आहे. क्षयरोगा विरोधातल्या या लढयामध्ये सर्वांनी एकत्र येण्याची आवश्यकता आहे. या विशेष मोहिमेव्दारे अद्याप निदान न झालेल्या क्षयरुग्णांचा शोध घेऊन त्यांचेवर उपचार करण्यात येणार आहे. ग्रामीण भागासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते तसेच शहरी भागासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांच्या मार्गदशनाखाली सदर मोहिम राबविण्यांत येत आहे. या करीता सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा श्रीधर गुट्टे यांनी केले.

## महत्त्वाचे...

### महापालिकेकडून सलग दुसऱ्या दिवशी प्लास्टिक जप्तीची कारवाई; ६८० किलो प्लास्टिक ग्लास, कॅरीबॅग जप्त






दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालना शहरात आज दुसऱ्या दिवशीही बंदी असलेल्या सिंगल युज प्लास्टिक विक्री करणाऱ्या दुकानात छापा टाकण्यात आला. महानगरपालिकेच्या पथकाने ही कारवाई केली आहे. नवीन मोंढा भागातील शिवशंकर ट्रेडर्स या दुकानात टाकलेल्या छाप्यात ५० हजार रुपये किंमतीचे ६८० किलो प्लास्टिक ग्लास, कॅरीबॅग जप्त करण्यात आले आहेत. दरम्यान या दुकानदाराला महापालिकेच्या पथकाने ५ हजार रुपयांचा दंड ठोठावल्याची माहिती जालना महानगरपालिका सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांनी दिली आहे.

### अमली पदार्थ विकणाऱ्या महिलेसह दोघांना मुंब्रा पोलीसांनी केली अटक




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** अमली पदार्थ विकणाऱ्या महिलेसह दोघांना मुंब्रा पोलिसांनी अटक केली. त्यांनी विक्रीसाठी जवळ बाळगलेल्या मोफेड्रॉन पावडर (एम.डी.) या अमली पदार्थासह एकूण सहा लाख २३ हजार ९०० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला. मुंब्रा बायपास रस्त्यावरील सध्या बंद असलेल्या टोलनाक्याजवळ एम.डी. पावडर विकण्यासाठी काहीजण येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलिसांनी सापळा रचून फैजान मेमन, तरन्नुम फणसोपकर या महिलेला ताब्यात घेतले.त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे त्यांनी विक्रीसाठी जवळ बाळगलेली अनुक्रमे १०२ आणि २०० ग्रॅम एमडी पावडर आढळली. त्याच्याजवळ असलेला इतर मुद्देमाल ताब्यात घेऊन पोलिसांनी दोघांना अटक केली.

### बुलढाणा येथे आज सहकार से समृध्दी कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाकडून नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पेतून 'सहकार से समृध्दी' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे व्ही.सी. व्दारे दि. २५ डिसेंबर रोजी दुपारी १.३० वाजता दि बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक बुलडाणा सभागृहामध्ये प्रक्षेपित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानसाहेब चव्हाण यांनी केले आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'सहकार से समृध्दी' अंतर्गत बहुउद्देशीय प्राथमिक सहकारी संस्था, दूध व्यवसाय व मत्सपालन सहकारी संस्थांच्या स्थापनेव्दारे ग्रामपंचायत व गावांना समाविष्ट करण्याची योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेतंर्गत स्थापन झालेल्या १० हजार प्राथमिक सहकारी संस्थापैकी ६ हजार संस्था दूध व्यवसायाशी निगडीत आहेत. महत्वपूर्व उपलब्धी साजरी करण्यासाठी केंद्र शासनाच्या सहकार मंत्रालयाकडून २५ डिसेंबर रोजी नवी दिल्ली येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे व्हीसी व्दारे दुपारी १.३० वाजता दि बुलडाणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक सभागृहामध्ये प्रक्षेपित केल्या जाणार आहे. या कार्यक्रमाध्ये बुलढाणा जिल्ह्यातील केंद्रीय योजनेतंर्गत उत्कृष्ठ काम करणाऱ्या सेवा सहाकरी संस्थाचे (जन औषधी केंद्र/सीएससी सेंटर/गोदाम बांधकाम) असे विविध उपक्रम राबविलेल्या संस्थांच्या कामकाजाची माहिती फोटो व व्हिडीओव्दारे देण्यात येणार आहे. या कार्यक्रमास जिल्हा सहकार समिती (वलवल) जिल्हा सहकार समितीअंतर्गत संयुक्त कार्यकारी समितीचे सदस्य प्राथमिक पत पुरवठा सहकारी संस्था व मत्स सहकारी संस्थांचे पदाधिकारी संचालक मंडळ, संघाचे प्रतिनिधी, सचिव यांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण यांनी केले आहे.



### अंबड शहरात गोळीबार, एक जण जखमी; आरोपी फरार

**जालना/प्रतिनिधी :** काल जालना जिल्ह्यातील अंबड शहरात गोळीबार झाला होता. अंबड- पाचोड रोडवर ही घटना घडली होती. या गोळीबारात एक जण जखमी झालाय आहे. ३५ वर्षीय किशोर गायकवाड असं जखमी झालेल्या तरुणाचं नाव असून त्याच्या मांडीला गोळी लागली आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहेत तर गणेश खरात असं गोळीबार करणाऱ्यांचे नाव असून तो फरार आहे. हॉटेलच्या वादातून हा गोळीबार झाल्याची माहिती देखील समोर आली आहे. दरम्यान गोळीबारानंतर आरोपी फरार झाला असून त्याच्यावर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या शोधासाठी पोलीस पथक रवाना करण्यात आले असून पोलीस अधीक्षकांनी घटनास्थळी जाऊन या घटनेची माहिती घेत कारवाईचे आदेश दिले आहेत.

## ई-पीक पाहणी नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी** : सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची (ई-पीक पाहणी) सुरुवात दि १ डिसेंबरपासून सुरू झालेला आहे. आपल्या सातबारावर पीक पेरा स्वता: शेतकऱ्यांनी ॲन्ड्राईड फोन द्वारे नोंदणी करायची आहे.

शेतकरीस्तरावर पीक पाहणी करण्यासाठी अंतिम दि. १५ जानेवारी २०२५ पर्यंत आहे. रब्बी हंगामी २०२४ ई पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आज रोजी पर्यंत ७५६५३५ हे. आर. क्षेत्रापैकी १०९०९६ हे. आहे क्षेत्रावर, तसेच एकूण ८३६०३३ पीक पाहणी करावयाच्या owner's प्लॉटपैकी १०५६४२ प्लॉटवर संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ईपीक पाहणी डीसीएस व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे आपल्या सातबारावर नोंदणी केलेली आहे.



आजवर बुलढाणा जिल्ह्यात डिजटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई-पीक पाहणीची नोंदणी १४.४२ टक्के क्षेत्रावर झोलेली आहे. उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकरी बांधावांना ई पीक पाहणी पद्वारे पीकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदर पीक पाहणीची नोंदणी ई पीक पाहणी व्हर्जन ३.० या मोबाईल ॲपद्वारे करतांना न्ड्रॉईड फोन आवश्यक आहे. सदर ॲप गूगल फोन अपडेट करून मोबाईलमध्ये इन्स्टॉल करून घ्यावे. ई पीक पाहणी ॲप द्वारे शेत बांधावर जावुन पीकांची नोंदणी करून माहिती अपलोड करावी. या कामी संबंधित शेतकऱ्याजवळ मोबाईल उपलब्ध नसल्यास, संबंधित गावाचे तलाठी, कोतवाल तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर यांची मदत घेवून आपल्या पीकांची नोंदणी ई-पीक पाहणी पद्वारे करून घेण्यात यावी. सदर पविषयी काही अडचण असल्यास संबंधित गावाचे तलाठी तसेच कॉमन सर्व्हिस सेंटर, आपल्या गावातील डीसीएस करिता नियुक्त सहाय्यक यांची मतद घ्यावी.

ई पीक पाहणी द्वारे पीकांची नोंदणी न केल्यास आपल्या सातबारा वर पीक पेरा कोरा राहील. जो नंतर भरता येत नाही त्यामूळे पीक विमा, व इतर शासकीय अनुदान व लाभ मिळविण्यास अडचण निर्माण होईल. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गीक आपत्ती या बाबत पिक विमा मिळण्यासाठी सातबारा वर अचूक पीक नोंद असणे आवयक आहे. त्याअनुषंगाने सर्व शेतकरी बांधवांनी १५ जानेवारी २०२५ पुर्वी आपल्या पीकांची नोंदणी करून घेण्यात यावी, असे आवाहन प्र. जिल्हाधिकारी सदाशिव शेलारे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## खामागावीतल उपजिल्हा सामान्य रुग्णालयात दररोज सातशेच्यावर रुग्ण ओपीडीत ; हवामान बदलाचा परिणाम







दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** गेल्या आठवडाभरापासून एकूण जिल्ह्यात वाढलेली थंडी, ढगाळ वातावरणामुळे कमी झालेली थंडी आणि त्यानंतर पुन्हा थंडीचे आगमन असे वातावरण पाहायला मिळत आहे. या बदलत्या हवामानाचा परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे. एकाच आठवड्यात खामगाव येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात तब्बल ७ हजार ३६६ रुग्णांची तपासणी आणि उपचार करण्यात आले. आठवडाभरात जिल्ह्यात सर्दी व तापाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. अचानक बदललेल्या वातावरणामुळे आरोग्यावर परिणाम झाला असून, उपजिल्हा सामान्य रुग्णालयासोबतच शहरी आरोग्य केंद्र ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांतही रुग्ण संख्या वाढली आहे. खामगाव येथील उपजिल्हा सामान्य रुग्णालयात सकाळच्या आणि सायंकाळच्या ओपीडीतही रुग्णांची संख्या वाढली आहे. वातावरण बदलामुळे सर्दी, ताप, खोकला अशा प्रकारच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. यामध्ये लहान बालकांसोबतच वृद्धांची संख्या अधिक आहेत. नागरिकांनी अंगावर दुखणे न काढता वेळीच उपचार करून घ्यावेत असे आवाहन वैद्यकिय अधीक्षक डॉ. नीलेश टापरे यांनी केले आहे.

## सीबीआय चौकशीच्या मागणीकरिता वडार समाज संघटना आक्रमक

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड / तालुका प्रतिनिधी** : परभणी येथील वडार समाजाचा युवक सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलीस कोठडीमध्ये असताना अमानुषपणे मारहाणीदरम्यान झालेल्या मृत्यूची सीबीआय चौकशी करून त्याच्या परिवारास शासकीय मदत देण्यात यावी, अशी मागणी 'मी वडार महाराष्ट्राचा' या संघटनेच्या वतीने उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. 'मी वडार महाराष्ट्राचा' या संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे असलेले निवेदन उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी यांना दिले. त्यामध्ये परभणी येथील वडार समाजाचा




विद्यार्थी सोमनाथ सूर्यवंशी जो वकिलीचे शिक्षण घेत होता. त्याच्यावर परभणी येथील पोलीस प्रशासनाच्या वतीने झालेल्या कारवाईत न्यायालयीन पोलीस कोठडीमध्ये अमानुषपणे मारहाण केली. यात त्याचा मृत्यू झाला. वकिलीचे शिक्षण घेत असलेला वडार समाजाचा विद्यार्थी ज्याचा परभणी येथे झालेला दगडफेकीशी काहीही संबंध नसताना त्याच्यावर अशी कारवाई होणे व त्याचा मृत्यू होणे ही समाजासाठी अत्यंत दुःखदायी घटना आहे. त्याचा मृत्यू संशयास्पद आहे.या कारणाने घटनेची सीबीआय चौकशी व्हावी व या गरीब विद्यार्थ्यांच्या परिवारास शासकीय मदत मिळावी, अशी मागणीकरिता झालेल्या घटनेचा जाहीर निषेध नोंदवीत असल्याचे निवेदनात नमूद आहे. 'मी वडार महाराष्ट्राचा' संघटनेचे तालुकाध्यक्ष पवन मेंढे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी निवेदन सादर केले. यावेळी रमेश मेंढे, सुभाष बाभुळकर, अंकुश बाभुळकर, शंकर पवार, अनिल मेंढे, पप्पू जाधव, मसू जाधव, सुधाकर मेंढे, विशाल धोत्रे व संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

> परभणीमधील पोलिसांच्या कोम्बिंग ऑपरेशनची आणि एकूण सर्व प्रकाराची सखोल न्यायालयीन चौकशी व्हावी. ही चौकशी सीटिंग न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली व्हावी. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबाला शासनाने आर्थिक मदत द्यावेत आणि कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घ्यावं.
>
> **-तालुकाध्यक्ष वडार समाज संघटना, उमरखेड**

# भालेगाव येथे तलाठीभवन बांधकामाचे संजय रायमुलकर यांच्या हस्ते लोकार्पण

## पूर संरक्षण भिंतीच्या कामाचे भूमिपूजन

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** भालेगाव येथे २८ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या तलाठी भवनाचे भूमिपूजन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते आज करण्यात आले. येथील ४७ लाख रुपये खर्चाच्या पूर संरक्षण भिंतीचे भूमिपूजनही रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव अध्यक्षस्थानी होते.

संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून मेहकर तालुक्यात तलाठी भवन व मंडल अधिकारी कार्यालय अशी १४ कोटी २३ लाख रुपये खर्चाची ५० बांधकामे मंजूर करण्यात आली होती. त्यांच्याच प्रयत्नातून तालुक्यातील लोणार तालुक्यातील ७ कोटी १७ लाख रुपये खर्चाचे २८ तलाठी भवन, ५ मंडळ अधिकारी कार्यालय अशी बांधकामे मंजूर करण्यात आलेली आहेत. सदर बांधकामे जवळपास पूर्णत्वास गेली आहेत. भालेगाव येथील तलाठी भवनाचे लोकार्पण संजय रायमुलकर यांच्या हस्ते पार पडले. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्या जवळील सौंदर्यीकरण कामाची पाहणी रायमुलकर यांनी केली.






नदीच्या पुरामुळे परिसरातील शेतीचे नुकसान होऊ नये व नागरिकांना त्याचा त्रास होऊ नये म्हणून संजय रायमुलकर यांच्या प्रयत्नातून ४७ लाखाच्या पूर संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन आज त्यांच्या हस्ते करण्यात आले. शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, दिलीपबाप्पू देशमुख ,संबंधित विभागाचे सहाय्यक अभियंता श्री आडोळे, दत्ता गाडे ,तेजराव धोंडगे, मधुकर पाटील, समाधान महाराज,सुभाष पाटील, अंबादास निकम,रमेश धोंडगे, माजी प्राचार्य टी .बी. धोंडगे,पोलीस पाटील मधुकर निकम ,सरपंच प्रवीण निकम, उपसरपंच मंगलाताई निकम,शिवसेनेचे विभाग प्रमुख भास्कर निकम,गणेश निकम, तेजराव डव्हळे, संदीप पुरी,गजानन निकम, अशोक दाभाडे,तोताराम धोंडगे, प्रताप धोंडगे,संजय झनक, श्रीकिसन धोंडगे, हिंमत गवई,गणेश खवले,सखाराम वडतकर,प्रल्हाद धोंडगे, अविनाश धोंडगे आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

मेहकर, लोणार मतदार संघात मोठ्या प्रमाणावर विकास कामे मंजूर आहेत, परंतु आचारसंहिता लागल्यामुळे संबंधित कामांचे भूमिपूजन, उद्घाटन होऊ शकले नाही, असे यावेळी बोलताना संजय रायमुलकर म्हणाले. दोन्ही तालुक्यातील त्या त्या ठिकाणी आवश्यक असलेली विकासाची कामे राज्यात महायुती आणि सरकार असल्यामुळे यापुढेही आपण मंजूर करून आणू, असेही ते म्हणाले.

## विविध वृत्त...

### दक्षता व भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्हा दक्षता समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये सोमवार, दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे. तसेच भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजता घेण्यात येणार आहे.

जिल्हा दक्षता समिती सभा तसेच जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीची सभा यात ज्या व्यक्तींना तक्रारी दाखल करावयाच्या असतील त्यांनी प्रतिज्ञालेखासह तक्रारी स्पष्ट शब्दात सबळ पुराव्यानिशी समिती समोर दाखल करावे, असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या तहसिलदार यांनी केले आहे.

### अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदाराव अडसूळ शुक्रवारी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** अनुसूचित जाती-जमाती आयोगाचे अध्यक्ष आनंदाराव अडसूळ शुक्रवार, दि.२७ डिसेंबर २०२४ रोजी बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शुक्रवार, दि. २७ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४ वाजता जालन्याहून अमरावती येथे आगमन व सर्किट हाऊसकडे प्रयाण . दुपारी ४.३० वाजता सर्किट हाऊस बुलढाणा येथे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण विभाग बुलढाणा यांच्या सोबत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनेबाबत आढावा व चर्चा. रात्री बुलढाणा (मलकापूर ) येथून अमरावती एक्सप्रेसने मुंबईकडे प्रयाण करतील.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी केलेल्या वक्तव्या विरोधात मोताळा येथे जन आक्रोश मोर्चा




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देशभरात केंद्रीय गृहमंत्री अमित शहां विरोधात आंबेडकरी जनता आक्रमक झाली असून रस्त्यावर उतरली आहे. तसेच परभणीतील घटनेच्या विरोधात जनतेमध्ये प्रचंड रोष दिसून येत आहे. या दोन्ही घटनेच्या विरोधात मोताळा येथे शिव शाहू फुले आंबेडकर फोरमच्या वतीने जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चा मध्ये अमित शहा यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली तसेच परभणी घटनेतील दोषीवर कारवाई करून कठोर कारवाई करण्यात यावी या मागण्या करण्यात आल्या आहेत.

### शिक्षकांच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी महागाव पंचायत समितीत भरवली शाळा





दैनिक आपला विदर्भ

**यवतमाळ/प्रतिनिधी :**महागाव पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या वागद इजारा येथील जिल्हा परिषद मराठी शाळेत विद्यार्थ्यांची पटसंख्या ४५ असून या ठिकाणी एकच शिक्षक कार्यरत आहेत. तालुक्यात अनेक ठिकाणी १५ विद्यार्थी संख्याची पटसंख्या असतानाही दोन-दोन शिक्षक त्या ठिकाणी नियुक्त आहे. जिथे गरज असताना शिक्षक नाही याच विधायक मागणीसाठी वागद इजारा येथील एक ते चौथीपर्यंतच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकासह गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयात शाळा भरवली. या विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी देत मोर्चा काढून शिक्षकांची मागणी केली आहे.

### वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार सरसावले !

**पुणे/प्रतिनिधी :**शहरात होत असलेल्या वाहतूक कोंडीचा फटका नागरिकांना बसत आहे. शहरातील विविध भागात दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण झाले असून वाहनांच्या लांबच्या लांब रांगा रस्त्यावर लागत आहेत. वाहनचालकांना तासनतास या वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागते.'शहरातील रस्त्यांवर सतत होत असलेल्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्यासाठी रस्त्यांची स्थिती सुधारा, रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करा. तसेच, सर्व यंत्रणांच्या मदतीने 'सर्वकष गतिशील आराखडा' (म ोबिलिटी प्लॅन) तयार करा,' अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांना केल्या.

### काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा दौरा पूर्णपणे राजकीय- अशोक चव्हाण



**नांदेड/प्रतिनिधी :** काल लोकसभेचे विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी परभणी येथील आंदोलनातील आंदोलक सोमनाथ सुर्यवंशी यांची न्यायलयीन कोठडीतील मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली यावर खासदार अशोक चव्हाण म्हणाले की, असा निष्कर्ष काढण अतिशय चुकीचं आहे. त्यांचे वक्तव्य पूर्ण पणे राजकीय आहे. एखादी त्यांच्या पूर्ण चौकशी नंतर स्पष्ट होईल परंतु कोणी व्यक्ती एखाद्या समाजाचा आहे म्हणून त्यांची मुद्दाम हत्या केली गेली असा निष्कर्ष चौकशीच्या आधीच काढणं उचित नाही. त्यांचा दौरा पूर्ण राजकीय होता. काल नाना पटोले यांनी अशोक चव्हाण यांच्या वर केलेल्या टीकेला ते म्हणाले नाना जर आमची लायकी काढत असतील तर त्यांची लायकी साकोलीच्या जनतेने ठरवून दिली आहे, २०० मतांनी निवडून आले आणि आम्ही ५० हजारांनी आलो.

## नागपूर पोलिसांनी मध्यरात्री 'पुष्पा' फॅनला थिएटरमधून पकडले, या आरोपीवर तस्करी असे २७ गुन्हे दाखल



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** आजकाल पुष्पा या चित्रपटाची खूप चर्चा होत आहे, पुष्पा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे, दरम्यान, महाराष्ट्रातील नागपूर पोलिसांनी पुष्पाच्या चाहत्याला चित्रपट पाहताना पकडले आहे. पुष्पाचा हा चाहता गँगस्टर आहे. एकट्या नागपुरात याविरोधात २७ गुन्हे दाखल आहेत. ज्यामध्ये खून आणि अंमली पदार्थांच्या तस्करीच्या दोन गुन्ह्यांचाही समावेश होता, त्यामुळे नागपूर पोलिसांनी त्यावर एमपीडीए (महाराष्ट्र प्रिव्हेन्शन ऑफ डेंजरस क्टिव्हिटीज) लागू केला आहे. वास्तविक, नागपूरच्या एका चित्रपटगृहात पुष्पा चित्रपट-२ दाखवला जात होता, त्याच चित्रपटगृहात एक अमली पदार्थ तस्करही चित्रपट पाहण्यात तल्लीन होता, याची माहिती पोलिसांना अगोदरच मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी आरोपी तस्कराला अटक करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी थिएटरमध्येच पोलिसांनी प्लॅन करून चित्रपटाची तिकिटे खरेदी केली आणि आरोपी विशाल मेश्रामच्या मागे बसले आणि डावीकडे साध्या वेशातील पोलिसाने संधी पाहून विशाल मेश्रामला पकडले. पोलिसांकडून. ज्या गाडीतून विशाल मेश्राम आला होता, तीही पंक्चर झाली होती. चित्रपटाच्या क्लायमॅक्सच्या वेळी जेव्हा पोलीस हॉलमध्ये गेले तेव्हा मेश्राम चित्रपटात हरवला होता. पोलिसांनी त्याला घेराव घातला आणि त्याला विरोध करण्याची संधी न देता त्वरीत अटक केली. मेश्राम सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात असून लवकरच त्याला नाशिक कारागृहात हलवण्यात येणार आहे.



## व्हॉलीबॉल अजिंक्यपद क्रीडा स्पर्धेसाठी आज निवड चाचणी

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या द्वारा दि. ७ ते १३ जानेवारी २०२५ या कालावधीत जयपूर राजस्थान या ठिकाणी सन २०२५ मधील वरीष्ठ गटाच्या राष्ट्रीय अंजिक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या निवड चाचणी कार्यक्रमाकरीता वरिष्ठ गटाच्या व्हॉलीबॉल या खेळाच्या इच्छुक खेळाडुंनी (पुरुष /महिला) दि. २५ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा क्रीडा संकुल,जांभरून रोड, बुलढाणा येथे उपस्थित रहावे. राष्ट्रीय स्तरावर व्हॉलीबॉल या खेळप्रकारातील अधिकृत एकविध खेळ संघटना कार्यरत नसल्याने, भारतातील व्हॉलीबॉल खेळाच्या प्रसार व प्रचाराचे काम सुरळीत सुरु रहावे यासाठी इंडियन ऑलिम्पिक असोसिएशनद्वारा डहॉक समितीची नियुक्ती करण्यात आली आहे.



प्रस्तावित राष्ट्रीय स्पर्धे साठी राज्य संघाची निवड दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता चंद्रशेखर आगाशे शारीरकि शिक्षण महाविद्यालय, गुलटेकडी पुणे ४११०३७ येथे करण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हयाचा संघ निवडकरण्याकरीता खालील प्रमाणे निवड चाचणीचा कार्यक्रम आयोजित केला आहे. राष्ट्रीय स्पर्धेसाठी, राज्य संघाची निवड चाचणी दरम्यान निवास व भोजनाची व्यवस्था खेळाडुंनी स्वत:करायची आहे. खेळाचा गणवेष, आधार कार्ड, पासपोर्ट साईज फोटो सोबत आणणे अनिवार्य आहे. उपस्थित खेळाडुमधुन उत्कृष्ठ पुरुष व महिला प्रत्येकी एक एक संघ पुणे येथे होऊ घातलेल्या राष्ट्रीय स्पर्धा निवडचाचणी कार्यक्रमा करीता पाठविण्यात येईल.

निवड चाचणी कार्यक्रम जिल्हा क्रीडा अधकिारी कार्यालय बुलढाणा व बुलढाणा जिल्हा व्हॉलीबॉल खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे. अधिक माहीती करीता क्रीडा अधिकारी आर. आर. धारपवार यांना ९९७०११८७९७ या क्रमांकावर संपर्क साधावा. उक्त निवड चाचणी करिता उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बी.एस.महानकर बुलढाणा यांनी केले आहे.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विशेष मोहिमेमध्ये

# २ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील अवैध दारु निर्मियती, हातभट्टी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर एकूण १४ ठिकाणी छापे घालून १४ गुन्हे नोंदविले असून १४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयात एकुण १ वाहन जप्त केले असून या गुन्ह्यात एकूण २,९६,०१५ रुपयांचा मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा विभागाने जप्त केलेला आहे. जिल्ह्यात नाताळ व नववर्ष आगमनाच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा कार्यालयाच्या वतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा कार्यालयाच्या वतीने अवैध मद्य निर्मिती, वाहतुक व विक्री वर प्रतिबंध घालण्यासाठी बुलढाणा जिल्हयातील कार्यक्षेत्रीय अधिकारी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा, निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, देऊळगाव राजा व निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, खामगाव व निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक यांच्याकडून बुलढाणा जिल्हयातील विविध हातभटटी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर छापे टाकुन कारवाई केलेली आहे.



मा. आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई विजय सूर्यवंशी (भा.प्र.से.) साहेब. संचालक श्री. प्रसाद सुर्वे साहेब व विभागीय उप-आयुक्त अर्जुन ओहोळे साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे गुन्हाअन्वेषणाचे कामकाज सुरू आहे. तसेच डॉ.पराग नवलकर अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयात दि. २१ डिसेंबर २०२४ व २२ डिसेंबर २०२४ रोजी मोहिम राबविण्यात आली आहे. सदर मोहिमेत बुलढाणा जिल्ह्यातील अवैध दारु निर्मीती, हातभटटी ठिकाण, तसेच अवैध मद्यविक्री केंद्रावर एकुण १४ ठिकाणी छापे घालुन १४ गुन्हे नोंदविले असुन १४ आरोपींना अटक केली असुन सदर गुन्हयात एकुण १ वाहन जप्त केले असुन सदर गुन्हयात एकुण रुपये २,९६,०१५ /- एवढा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

सदर कारवाई किशोर पाटील, निरीक्षक, बुलढाणा यांच्या अधिनस्त असलेले ए.जी.शिंदे दुय्यम निरीक्षक, बुलढाणा -१, आर.के. विठोरे दुय्यम निरीक्षक, बुलढाणा-२ व सतिश पाटील दुय्यम निरीक्षक, बुलढाणा-३ तसेच विकास पाटील निरीक्षक, खामगाव यांच्या अधिनस्त असलेले आर.एन. गावंडे दुय्यम निरीक्षक खामगाव -१ व ३. कुटेमाट दुय्यम निरीक्षक खामगाव-२ तसेच राहुल रोकडे निरीक्षक. देऊळगाव राजा यांच्या अधनस्त असलेले रोटे, दुय्यम निरीक्षक देऊळगाव राजा-१ नयना देखमुख, दुय्यम निरीक्षक देऊळगाव राजा-२ व ३ तसेच महेश बोज्ञावारी निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक बुलढाणा यांच्या अधिनस्त असलेले माकोडे दुय्यम निरीक्षक, भ.प. यांच्या सहभागाने व मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, व त्यांचे अधिनस्त कर्मचारी यांचया सहभागा आहे. अवैध मद्यविक्री करणाऱ्या हॉटेल्स, धाब्यांबाबत अवैध मद्य निर्मीती, वाहतुकीबाबत माहिती देण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून टोल फ्री नंबर १८००२३३९९९९ वर किंवा व्हॉटसप नंबर ८४२२००११३३ वर किंवा excisesuvidha.mahaonline.gov.in या विभागाचे पोर्टलवर तात्काळ कळवावे.